दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# रायगड नगरी

मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

रायगडसह ठाणे, नवी मुंबई, मुंबई, पुणे येथून प्रकाशित

• वर्ष १७ वे • अंक २७५ • MAHMAR/2006/17212 • रायगड • बुधवार दि.४ जानेवारी २०२३ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# उरणमध्ये वृध्द महिलेची हत्या

## संशयास्पद हत्येने तालुका हादरला ; फॉरेन्सिक पथक दाखल

**दै.रायगड नगरी । उरण**

**उरण शहराजवळ असलेल्या बोकडविरा येथील ललिता ठाकूर या ६४ वर्षीय वृध्द विधवा महिलेची हत्या झाली आहे. नवीन वर्षांच्या स्वागताच्या सुरवातीलाच घडलेल्या या हत्येमुळे बोकडविरा गावसाह परिसर चांगलाच हादरला आहे. बोकडविरा येथे ललिता ठाकूर ही ६४ वर्षीय वृध्द विधवा महिला एकटीच राहात होती. पतीच्या निधनानंतर कुणीही नसलेली वृद्ध येथील खासगी शाळेत मोलमजुरी तसेच मालकीच्या तीन खोल्यांपैकी दोन खोल्या भाड्याने देऊन मिळणाऱ्या उत्पन्नातूनच आपली उपजीविका करीत होती.**

काल मंगळवारी सकाळी शाळा उघडण्यासाठी शाळेची चावी आणण्यासाठी तिच्या घराजवळ गेलेल्या कर्मचाऱ्याला ललिताबाई आढळून आल्या नाहीत. घरबंद असल्याने शेजारी व आसपासच्या घरातील लोकांकडूनही ललिताबाई दिसल्या नसल्याने सांगण्यात आले. त्यामुळे शेजाऱ्यांनी चौकशी करण्यास सुरुवात केली असतांना कुलुप बंद खोलीची खिडकी उघडली असता सदर महिला जमिनीवर निपचित पडलेली दिसली. तिचे हातपायही रस्सीने करकचून बांधलेले होते. याबाबत पोलिसांना माहिती मिळताच उरण पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनिल पाटील आपल्या सहकाऱ्यांसह घटनास्थळी धाव घेतली.

ललिताबाई यांच्या शेजारचीच खोली मोलमजुरी करणाऱ्या अमोल सर्जेराव शेलार या इसमाला भाड्याने दिली आहे. त्याच खोलीत ललिताबाई यांची हत्या झाली आहे. हत्येनंतर खोलीला बाहेरून कुलूप लावण्यात आले आहे. भाडोत्री अमोल सर्जेराव शेलार घटनेपासूनच फरार झाला आहे. ललिताबाई यांच्याशी दोन दिवसापूर्वी भाडोत्र्याबरोबर भांडण झाले होते. या वादातूनच खून झाला असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. दरम्यान घटनास्थळी फॉरेन्सिक लॅब, फिंगरप्रिंट, श्वान पथक दाखल झाले आहे. त्यांच्याकडून तपासणी सुरू आहे. अद्यापही कशामुळे आणि कशी हत्या झाली आहे. हे सांगणे कठीण आहे.

मात्र शवविच्छेदनानंतरच नेमक्या कारणांची माहिती मिळेल. दरम्यान संशयित फरार आरोपीचा शोध घेण्यासाठी पोलिस पथके तयार करण्यात आली असल्याची माहिती उरण पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनिल पाटील यांनी दिली आहे. दरम्यान नवीन वर्षांच्या स्वागताच्या सुरवातीलाच घडलेल्या महिलेच्या हत्येमुळे बोकडविरा गावसाह परिसर हादरला आहे.

# मडगाव नागपूर एक्स्प्रेस घेणार शेगाव थांबा

## कोकणातील गजानन महाराज भक्तांमध्ये आनंदाचे वातावरण



**दै.रायगड नगरी । पनवेल**

कोकणाला विदर्भाशी जोडणारी नागपूर – मडगाव एक्सप्रेस उद्या दिनांक ४ जानेवारीपासून शेगाव येथे थांबणार आहे. सदरच्या एक्सप्रेस ला शेगाव थांबा मिळावा यासाठी पनवेल प्रवासी संघ गेली ४ वर्षे पाठपुरावा करत होता. पनवेल प्रवासी संघाच्या मागणीला यश प्राप्त झाल्याने कोकण किनारपट्टीतील श्री संत गजानन महाराज यांच्या भक्त संप्रदायामध्ये अत्यंत आनंदाचे वातावरण पाहायला मिळते आहे.

मडगाव ते नागपूर एक्सप्रेस क्रमांक ०११३९ आणि परतीच्या मार्गावरील नागपूर मडगाव एक्सप्रेस क्रमांक ०११४० उद्या दिनांक ४ जानेवारीपासून शेगाव येथे थांबा घेणार आहे. बुधवारी दुपारी तीन वाजून पाच मिनिटांनी नागपूर येथून सुटणारी ही गाडी साधारण साडेसात वाजता शेगाव रेल्वे स्टेशनवर पहिल्यांदाच थांबा घेईल. पनवेल परिसरातील भक्तगण यांना देखील शेगाव येथे जाण्यासाठी ही गाडी अत्यंत सोयीची ठरणार आहे. मडगाव येथून रात्री ८ वाजता सुटणारी गाडी सकाळी ७ वाजता पनवेल येथे पोहोचेल. सकाळी ७.०५ वाजता पनवेल स्थानक येथून प्रस्थान करणारी गाडी दुपारी साडेतीन वाजता शेगाव येथे पोहोचेल. सदरची गाडी आठवड्यातून दोन दिवस चालविण्यात येते. प्रत्येक आठवड्यातील बुधवारी आणि शुक्रवारी ही गाडी नागपूर येथून सुटेल तर प्रत्येक गुरुवारी आणि रविवारी ही गाडी मडगाव येथून सुटेल.

या एक्सप्रेस गाडीचे शेगावसाठी ऑनलाइन आणि ऑफलाइन आरक्षण देखील सुरू झालेले आहे. श्री दत्त महाराज संप्रदायातील गजानन महाराज यांची संजीवन समाधी बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव येथे आहे. या समाधीच्या दर्शनासाठी राज्यभरातील भाविक शेगाव येथे येत असतात. कोकणपट्टीतील नागरिकांना शेगावला जाण्यासाठी थेट एक्सप्रेस गाड्या उपलब्ध नाहीत. पर्यायाने त्यांना मुंबई, ठाणा, कल्याण इथपर्यंत प्रवास करून दुसऱ्या गाडीने जाणे भाग पडते. विदर्भ आणि कोकण किनारपट्टी यांना जोडण्यासाठी अत्यंत महत्त्वाची समजली जाणारी मडगाव नागपूर एक्सप्रेस शेगाव या ठिकाणी थांबली पाहिजे या स्वरूपाची मागणी पनवेल प्रवासी संघाने लावून धरली होती.

> आमच्या मागणीला मान्यता मिळाली याचे समाधान तर आहेच पण त्याहीपेक्षा कित्येक योजने अधिक समाधान या गोष्टीचे आहे की आता कोकण किनारपट्टीतील श्रीसंत गजानन महाराज यांच्या भक्तगणांना थेट शेगाव येथे जाण्याची सुविधा निर्माण झाली आहे.
>
> **: डॉ.भक्तीकुमार दवे**

### कोकण विभाग मतदार संघाच्या नवीन मतदार यादीत ३७ हजार ७१९ मतदार

# आदर्श आचारसंहितेचा भंग होणार नाही यासाठी विशेष नियोजन : डॉ.महेंद्र कल्याणकर



**दै.रायगड नगरी । नवी मुंबई**

कोकण विभाग शिक्षक मतदारसंघाची अंतिम मतदार यादी प्रसिध्द झाली असून, कोकण विभागातील ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदूर्ग या जिल्ह्यांमध्ये एकूण ३७ हजार ७१९ मतदार आहेत. तसेच या निवडणूकीच्या अनुषंगाने आदर्श आचारसंहिता लागू झाली असून, याचा भंग होणार नाही याबाबत विशेष नियोजन करण्यात आले असल्याची माहिती कोकण विभागीय आयुक्त तथा निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांनी दिली. आज कोकण भवनातील समितीसभागृहात आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

भारत निवडणूक आयोगाकडून दि. १ नोव्हेंबर २०२२ या अर्हता दिनांकावर आधारीत कोकण शिक्षक मतदारसंघासाठी नव्याने याद्या तयार करण्याचा कार्यक्रम घोषित करण्यात आला होता. या घोषित कार्यक्रमानूसार कोकण विभाग शिक्षक मतदारसंघाची प्रारुप मतदार यादी बुधवार दि. २३ नोव्हेंबर २०२२ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती. या यादीनूसार कोकण विभगात एकूण ३० हजार १६२ मतदार असून त्यापैकी १६ हजार ८२ स्त्री मतदार असून १४ हजार ८० पुरुष मतदार होते.

या मतदार याद्यांवर दि. २३ नोव्हेंबर ते ०९ डिसेंबर २०२२ या कालावधीत प्राप्त झालेले दावे व हरकती निर्णीत करुन कोकण विभाग शिक्षक मतदारसंघाच्या मतदार यादीची अंतिम प्रसिध्दी शुक्रवार दि. ३० डिसेंबर २०२२ रोजी करण्यात आली. या अंतिम यादीनूसार कोकण विभागात एकूण ३७ हजार ७१९ मतदार असून त्यापैकी १८ हजार ९७ स्त्री मतदार आहेत तर १९ हजार ६२२ पुरुष मतदार आहेत.

> **अंतिम यादी जाहीर झाल्या नंतर भारत निवडणूक आयोगाने दि.२९ डिसेंबर २०२२ च्या परिपत्रकान्वये कोकण विभाग शिक्षक मतदारसंघाच्या व्दिवार्षिक निवडणूकीचा कार्यक्रम जाहीर केला असून त्याच दिवसापासून आचारसंहिता लागू करण्यात आली आहे. भारत निवडणूक आयोगाच्या जाहीर करण्यात आलेल्या कार्यमक्रमानूसार दि. ५ जानेवारी २०२३ रोजी निवडणूकीची अधिसूचना प्रसिध्द करण्यात येईल. दि. १२ जानेवारी रोजी नामनिर्देशन पत्रे सादर करण्याचा अखेरचा दिनांक असेल. दि. १३ जानेवारी रोजी नामनिर्देशन पत्रांची छाननी करण्यात येईल. दि. १६ जानेवारी रोजी उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा अंतिम दिनांक असेल. दि. ३० जानेवारी रोजी मतदान होईल. मतदानाची वेळ सकाळी ८.०० ते दुपारी ४.०० अशी असेल. दि. २ फेब्रूवारी रोजी मतमोजणी केली जाईल आणि दि. ४ फेब्रूवारी रोजी निवडणूक प्रक्रिया पूर्ण झालेली असेल.**

# अजित पवार यांच्या विरोधात आंदोलन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

**छत्रपती संभाजी महाराज यांच्याबद्दल केलेल्या वक्तव्याबद्दल विधानसभा विरोधीपक्षनेते अजित पवार यांच्याविरोधात पनवेल भाजपच्यावतीने मंगळवारी आंदोलन करून निषेध व्यक्त करण्यात आला.**



अजित पवार यांच्या या चुकीच्या विधानाचे राज्यभर पडसाद उमटले असून भाजपच्यावतीने छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे तीव्र आंदोलन करण्यात आले. यावेळी विरोधी पक्षनेते अजित पवार यांच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करत त्यांचा निषेध करण्यात आला. या आंदोलनात पनवेल महानगरपालिकेच्या माजी महापौर कविता चौतमोल, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी उपमहापौर सीताताई पाटील, चारुशीला घरत, भाजप पनवेल शहराध्यक्ष जयंत पगडे, माजी नगराध्यक्ष सुनील घरत, संदीप पाटील, माजी उपनगराध्यक्ष मदन कोळी, माजी नगरसेवक अनिल भगत, नितीन पाटील, मुकीत काझी, मनोहर म्हात्रे, संतोष शेट्टी, समीर ठाकूर, माजी नगरसेविका दर्शना भोईर, सुशीला घरत,राजश्री वावेकर, वृषाली वाघमारे, हेमलता म्हात्रे, रुचिता लोंढे, नीता माळी, ज्योती देशमाने, अंजली इनामदार, रायगड जिल्हा युवा मोर्चा अध्यक्ष मयुरेश नेतकर, पनवेल शहराध्यक्ष रोहित जगताप, अमरीश मोकल यांच्यासह भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी कार्यकर्ते सहभागी झाले होते.

# तारा गावाजवळील हत्येचा उलगडा ; २ आरोपी गजाआड

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुक्यातील तारा गावाच्या हद्दीत दीड महिन्यापूर्वी काही अज्ञात इसमांनी अज्ञात कारणावरून एका व्यक्तीची हत्या करून त्याचा मृतदेह ऑडी गाडी ठेवून ते पसार झाले होते. याप्रकरणी गुन्हे शाखा कक्ष २ पनवेलच्या पथकाने सातत्याने पाठपुरावा करून या गुन्ह्यातील दोन आरोपींना पकडले असून सदर हत्या ही सोन्याच्या देवाणघेवाणी वरून झाल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे.

मुंबई गोवा महामार्गावर तारा गावाच्या हद्दीत पुणे येथील व्यापारी व नामचीन गुंड संजय कार्ले यांची अज्ञातांनी हत्या करून त्याचा मृतदेह ऑडी गाडीमध्ये ठेवून पसार झाले होते. पुणे येथील इसमाचा पनवेल हद्दीत हत्या झाल्याने तालुक्यासह गुन्हेगारी क्षेत्रात खळबळ उडाली होती. या प्रकरणामध्ये हत्येच्या कारणासह आरोपींना शोधण्याचे मोठे आवाहन गुन्हे शाखा कक्ष २ पनवेल समोर होते. वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र पाटील यांच्या नेतृत्वाखाली सपोनि प्रवीण फडतरे, संदीप गायकवाड, पोउपनि वैभव रोंगे, मानसिंग पाटील, सुदाम पाटील, पोहवा प्रशांत काटकर, सचिन पवार, दीपक डोंगरे, रणजित पाटील, अनिल पाटील, मधुकर गडगे, तुकाराम सूर्यवंशी, अजित पाटील, जगदीश तांडेल, ज्ञानेश्वर वाघ, इंद्रजित कानू, रुपेश पाटील, निलेश पाटील, राहुल पवार, सागर रसाळ, पोना अजिनाथ फुंदे, प्रफुल्ल मोरे, नंदकुमार ढगे, अभय मेऱ्या, पोशि संजय पाटील, विक्रांत माळी आदींची पथके तयार करण्यात आली. या प्रकरणी शोध घेत असताना हत्या झालेली व्यक्तीचे नाव संजय कार्ले असून तो पुणे जिल्ह्यातील नामचीन गुंड असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्याच्यावर बनावट सोन्याची नाणी विकल्या प्रकरणी गुन्हा दाखल असून मोक्का लावण्यात आल्याचे पोलिसांना समजले. यांनतर पोलिसांनी मुंबई गोवा महामार्गावरील हॉटेल, रिसॉर्ट व सीसीटीव्ही फुटेज तपासणी तसेच गोपनीय माहितीवर व तांत्रिक तपासद्वारे सदर हत्या सराईत आरोपी असलेले मोहसीन मुलाणी (वय ३७) आणि अंकित कांबळे (वय २९) यांनी केल्याचे समजले. या दोघांचा शोध घेत असता आरोपी हे नेपाळ येथे पळून गेल्याचे समजले. मात्र पोलीस या दोघांचा माग काढत होते. अखेर सदर आरोपींपैकी एकजण देहूरोड पुणे येथे आल्याचे समजताच गुन्हे शाखा कक्ष २ च्या पथकाने झडप घालून मोहसीन मुलाणी याला ताब्यात घेतले. त्याच्याकडे एक पिस्तूल व तीन काडतुसे पोलिसांना आढळून आली. त्यांनतर पोलिसांनी अंकित कांबळे याला देखील ताब्यात घेतले. त्यांना पोलिसी खाक्या दाखवताच त्यांनी गुन्ह्याची कबुली दिल्याचे पोलीस सूत्रांकडून सांगण्यात आले आहे. या दोघांच्या अटकेमुळे अजूनही काही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.



# इंटक व पनवेल शहर जिल्हा काँग्रेस कार्यकर्त्यांचा ६ जानेवारीला मेळावा

## काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नानाभाऊ पटोले यांच्यासह नेतेमंडळींची उपस्थिती लाभणार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

संपूर्ण जिल्ह्यात काँग्रेसला चांगले दिवस आले आहेत. नुकत्याच झालेल्या ग्रामपंचायत निवडणुकीत काँग्रेसला घवघवीत यश मिळाले. युवक आणि महिला उत्साहाने पक्षात काम करताना दिसून येत आहेत. पक्षात सर्वांची एकजूट महत्वाची आहे. यासाठी आपापसातील मतभेद, हेवेदावे दूर करा. काँग्रेस सोडून इतर पक्षात जे गेले आहेत त्यांना त्याठिकाणी सन्मानाची वागणूक मिळत नाही. त्यांना सन्मानाने पुन्हा एकदा काँग्रेसमध्ये आणून घरवापसी करा, असे आवाहन रायगड जिल्हा काँग्रेस अध्यक्ष महेंद्र घरत यांनी केले. ते पनवेल काँग्रेस भवन येथे आयोजित महत्वाच्या बैठकीदरम्यान कार्यकर्त्यांशी संवाद साधताना बोलत होते.



इंटक व पनवेल शहर जिल्हा काँग्रेस कार्यकर्त्यांचा मेळावा शुक्रवार दि.६ जानेवारी रोजी पनवेल शहरातील आद्य क्रांतीवीर वासूदेव बळवंत फडके नाट्यगृहात काँग्रेसचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष आमदार नानाभाऊ पटोले यांच्या प्रमुख उपस्थितीत सकाळी ठीक ११ वाजता आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाच्या पूर्वतयारीनिमित्त आज (मंगळवार दि.३ जानेवारी) पनवेल शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्यावतीने महत्वाच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत ६ जानेवारी रोजी आयोजित इंटक व पनवेल शहर जिल्हा काँग्रेस कार्यकर्त्यांचा मेळाव्यादरम्यान पनवेल शहर जिल्ह्याच्या नूतन कार्यकारिणीची घोषणा, पनवेल अर्बन बँकेचे नवनिर्वाचित संचालक तसेच पनवेल उरण तालुक्यातील नवनिर्वाचित ग्रामपंचायत सरपंच, उपसरपंच व ग्रामपंचायत सदस्यांचा सत्कार, हात से हात जोडो अभियानासंदर्भात माहिती व नियोजन, अन्य पक्षातून काँग्रेसमध्ये येणाऱ्यांचा पक्ष प्रवेश यासह विविध महत्वाच्या विषयावर चर्चा करण्यात आली.

याप्रसंगी ठाण्याचे माजी महापौर तथा पनवेल शहर जिल्हा काँग्रेस निरीक्षक सुभाष कानडे, रायगड जिल्हा काँग्रेस कमिटी अध्यक्ष महेंद्र घरत, पनवेल शहर जिल्हा काँग्रेस अध्यक्ष अभिजीत पाटील, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष कॅप्टन कलावत, जिल्हा उपाध्यक्ष मिलिंद पाडगावकर, ॲड.अरुण कुंभार, अल्पसंख्याक जिल्हाध्यक्ष अखलाख शिलोत्री, तालुकाध्यक्ष नंदराज मुंगाजी, महिला जिल्हाध्यक्ष निर्मला म्हात्रे, युवक जिल्हाध्यक्ष हेमराज म्हात्रे, नौफिल सय्यद, मोहन गायकवाड, लतीफ शेख, मल्लिनाथ गायकवाड, अरविंद सावळेकर, वैभव पाटील, प्रताप गावंड, नित्यानंद म्हात्रे, विनया पाटील, माया अहिरे, प्रेमा अपाचा यांच्यासह सर्व पदाधिकारी, ब्लॉक अध्यक्ष, महिला व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

> काँग्रेस मधील जे कार्यकर्ते काँग्रेसला सोडून इतर पक्षात गेले आहेत त्यांची घरवापसी करून काँग्रेसची ताकद वाढवणे गरजेचे आहे. आगामी पनवेल महापालिका निवडणुकीसाठी काँग्रेसच्या प्रत्येक कार्यकर्त्याने तन–मन–धन अर्पण करून काँग्रेसला पुन्हा नवसंजीवनी देण्यासाठी कटिबद्ध राहावे. हात से हात जोडो हे अभियान यशस्वीपणे राबवण्यासाठी पनवेल काँग्रेसमधील पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी कसोशीने, एकजुटीने मेहनत घ्यावी.
>
> **– अभिजीत पाटील, जिल्हाध्यक्ष पनवेल शहर काँग्रेस**

# आ.लक्ष्मण जगताप अनंतात विलीन

**दै.रायगड नगरी । पुणे**



पिंपरी– चिंचवड शहरातील भाजपाचे जेष्ठ नेते, माजी शहराध्यक्ष आणि विद्यमान आमदार लक्ष्मण पाडुरंग जगताप (वय ५९) यांचे बाणेर येथील ज्युपिटर हॉस्पिटलमध्ये मंगळवारी सकाळी साडेनऊच्या सुमारास दीर्घ आजाराने निधन झाले. पिंपळे गुरव येथील जगताप कुटुंबियांच्या शेतात आमदार लक्ष्मण जगताप यांच्या पार्थिवावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी मंत्री अतुल सावे, जिल्हाधिकारी राजेश देशमुख, पी एमआर डी ए मुख कार्यकारी अधिकारी राहुल महिवाल, पोलीस आयुक्त विनयकुमर चोबे, पालकमंत्री चंद्रकांत पाटील, आमदार महेश लांडगे, अण्णा बनसोडे, नीलम गोऱ्हे, महेश लांडगे, माजी आमदार विलास लांडे, खासदार श्रीनिवास पाटील आदी उपस्थित होते.

### निरंकारी सद्गुरु माताजींचा नववर्षानिमित्त मानवतेला दिव्य संदेश

# ब्रह्मज्ञानामुळे आलेली स्थिरता ही जीवनात मुक्तीमार्गाला प्रशस्त करते : सुदीक्षाजी महाराज



**दिल्ली । वृत्तसंस्था**

ब्रह्मज्ञानाच्या प्राप्तीने जीवनामध्ये वास्तविक भक्तिचा प्रारंभ होतो आणि त्याच्या स्थिरतेने आपले जीवन भक्तिमय व आनंदीत होऊन जाते.'' असे उद्गार सद्गुरु माता सुदीक्षाजी महाराज यांनी ग्राउंड नं.८, निरंकारी चौक, बुराड़ी रोड (दिल्ली) येथे नववर्षानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या विशेष सत्संग समारोह प्रसंगी उपस्थित समस्त भक्तगणांना संबोधित करताना व्यक्त केले. या कार्यक्रमाचा दिल्ली तसेच एन.सी.आर. सह अन्य ठिकाणाहून देखील हजारोंच्या संख्येने उपस्थित राहून भाविक-भक्तगणांनी लाभ घेतला तसेच नववर्षाच्या पहिल्याच दिवशी साकार रुपातील सद्गुरुच्या दिव्य दर्शनाचा व अमृतवचनांचा आनंद घेऊन स्वत:ला कृतार्थ केले.

सद्गुरु माताजींनी ब्रह्मज्ञानाचे महत्व अधोरेखित करताना सांगितले की, ब्रह्मज्ञानाचा अर्थ क्षणोक्षणी परमात्मारूपी दिव्य प्रकाशात विचरण करणे होय. ही अवस्था आपल्या जीवनात तेव्हा येते जेव्हा यावरील दृढता नित्य टिकून राहिल आणि तेव्हाच खऱ्याअर्थाने मुक्ती प्राप्त होईल. याउलट जर आपण मायेच्या अधीन राहिलो तर आनंदाची अवस्था आणि मुक्ती प्राप्त करणे अशक्य होईल हे निश्चित होय. मायेच्या प्रभावापासुन स्वत:ला बचाव करुन जीवनाचा खरा उद्देश परमात्मा प्राप्ती आहे हे आपण समजून घेतलं पाहिजे आणि त्याला जाणून घेण्यासाठी प्रयत्नशिल राहिले पाहीजे. या जगामध्ये निरंकार ईश्वर आणि माया या दोहोंचा प्रभाव कायम असतो. यास्तव आपल्याला निरंकाराशी संलग्न राहून भक्ति केली पाहिजे. आपल्या जीवनात सेवा, सुमिरण, सत्संगला केवळ एक क्रियाकर्म किंवा हजेरीसाठी नव्हे तर निरंकार प्रभूशी वास्तविक रूपात एकरूप होऊन स्वत:चे कल्याण करायचे आहे.

सद्गुरु माताजींनी उदाहरणासह स्पष्ट केले, की विद्यालयामध्ये सर्व विद्यार्थी शिक्षण घेण्यासाठी येतात. ज्या विद्यार्थ्यांना ज्ञान समजत नाही, त्यांच्या शंका दूर करण्यासाठी तिथे शिक्षक उपस्थित असतात. ते त्यांच्या शंकांचे निरसन करुन त्यांना योग्य मार्गदर्शन करतात ज्यायोगे ते शिक्षणाने आपले जीवन यशस्वी करतात. दुसरीकडे काही विद्यार्थी संकोचाने किंवा अन्य काही कारणांनी आपल्या शंका मनामध्येच ठेवतात व पुढे त्याच शंकांचे नकारात्मक भावनेमध्ये रुपांतरण होते. शंकांचे निरसन न झाल्याने त्यांच्या प्रभावाखाली ते जीवनात यशस्वी होऊ शकत नाहीत. सद्गुरुचा भाव इतकाच आहे, की केवळ ब्रह्मज्ञान घेतल्याने जीवनात यश मिळू शकत नाही, तर ते समजून घेऊन जीवनात उतरविल्यानेच कल्याण होते. अन्यथा ज्ञानाचा प्रकाश असूनही आपले जीवन अंधारातच राहते आणि आपण आपला अमूल्य जन्म भ्रमामध्येच व्यतीत करतो.

मुक्तीच्या मार्गाचा उल्लेख करुन सद्गुरु माताजींनी सांगितले की, ज्यांनी खऱ्या अर्थाने ब्रह्मज्ञानाची दिव्यता समजून घेतली आणि त्याचा आपल्या जीवनात अंगीकार केला अशा संतांनाच मुक्ती मिळते. जीवनाचे महत्व आणि मोल तेव्हाच होते जेव्हा ते वास्तवात जगले जाते केवळ दिखाव्यासाठी नाही. आपण सर्व नित्य निरंतर क्षणोक्षणी या निरंकार प्रभूशी जोडून राहणे हीच खरी भक्ती होय.

शेवटी सद्गुरु माताजींनी सर्वांसाठी हीच प्रार्थना केली, की आपण सर्वांनी आपल्या उत्तम आचरणाने आणि भक्तीमय जीवनाने अवघ्या जगाला प्रभावित करत सुखद आणि आनंदाने परिपूर्ण जीवन जगावे. निरंकाराचा आधार घेऊन सर्व संतांचे जीवन मंगलमय व आनंदमय होवो.

# कर्जत भाजपकडून अजित पवार यांचा निषेध



**दै.रायगड नगरी । संजय गायकवाड**

**कर्जत** । राज्य विधानसभेचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी छत्रपती संभाजी महाराज यांच्याबद्दल अपशब्द काढल्याबद्दल अजित पवार यांच्या वक्तव्याचा निषेध कर्जत तालुका भारतीय जनता पक्षाच्या वतीने करण्यात आला.भाजपाच्या वतीने कर्जत येथील लोकमान्य टिळक चौकात कार्यकर्त्यांनी अजित पवार, सुषमा अंधारे, जितेंद्र आव्हाड यांच्या निषेधाच्या घोषणा दिल्या.

महाराष्ट्र विधानसभेचे नागपूर येथील विधिमंडळ अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी छत्रपती संभाजी महाराज यांच्याबद्दल अपशब्द वापरले असा भारतीय जनता पक्षाचा आरोप आहे. या प्रकरणात अजित पवार यांचा महाराष्ट्र भाजप कडून निषेध केला जात आहे. पवार यांचा निषेध करण्यासाठी कर्जत तालुका भाजपच्या वतीने कार्यकर्ते उपस्थित झाले होते. कर्जत शहरातील लोकमान्य टिळक चौकात कर्जत तालुका भाजप अध्यक्ष मंगेश म्हसकर यांच्या नेतृत्वाखाली निषेध आंदोलन करण्यात आले.

यावेळी भाजप रायगड जिल्हा सरचिटणीस दीपक बेहेरे, किसान मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष सुनील गोगटे, भाजप तालुका सरचिटणीस संजय कराळे, ॲड. हृषीकेश जोशी, महिला मोर्चा तालुका अध्यक्षा स्नेहा गोगटे, युवक कार्यकर्ते किरण ठाकरे, युवा मोर्चा तालुका अध्यक्ष प्रमोद पाटील, किसान मोर्चा तालुका अध्यक्ष शिरीष कदम, सोशल मीडिया रायगड जिल्हा समन्वयक गायत्री परांजपे, युवा मोर्चा तालुका सरचिटणीस प्रदेश खेडकर, दिनेश भरकले यांच्यासह कर्जत शहर अध्यक्ष बळवंत घुमरे, जेष्ठ कार्यकर्ते विनायक पवार, विजय कुलकर्णी, सुनील पाटील, विभाग अध्यक्ष योगेश घारे, केशव तरे आदी उपस्थित होते.

# क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंती निमित्त महापालिकेत अभिवादन



**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिकेच्या मुख्यालयात आज ( ३ जानेवारी ) भारतातील पहिल्या स्त्री शिक्षिका क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंती निमित्ताने अभिवादन करण्यात आले.

यावेळी मा.आयुक्त श्री.गणेश देशमुख, मुख्य लेखा अधिकारी मंगेश गावडे,मुख्य लेखा परिक्षक निलेश नलावडे, लेखापरिक्षक विनकुमार पाटील, लेखा अधिकारी संग्राम व्हारेकाटे, सामान्य् प्रशासन विभाग प्रमुख दशरथ भंडारी ,आस्थापना विभाग प्रमुख नामदेव पिचड, जनसंपर्क अधिकारी वर्षा कुलकर्णी व विविध विभागातील महिला कर्मचारी मोठ्या प्रमाणात उपस्थित होत्या.

## शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) च्या पाठपुराव्यामुळे ड्रेनेज लाईनचा प्रश्न निघाला निकाली

**दै.रायगड नगरी । पनवेल**

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) च्या पाठपुराव्यामुळे कळंबोली वसाहतीमधील सेक्टर १ मधील ड्रेनेज लाईनचा प्रश्न निकाली लागला असून यामुळे शेकडो रहिवाश्यांची दुर्गंधीतून सुटका झाली आहे.

कळंबोली वसाहतीमधील सेक्टर १ या ठिकाणी साठलेल्या ड्रेनेजमुळे मोठ्या दुर्गंध निर्माण झाली होती तसेच आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला होता. यासंदर्भात तेथील रहिवाश्यांनी शिवसेना(उद्धव बाळासाहेब ठाकरे) कळंबोली वसाहत शहर प्रमुख सूर्यकांत म्हसकर यांची भेट घेऊन त्यांच्या समोर वस्तुस्थिती मांडली. तातडीने शहरप्रमुख सूर्यकांत म्हसकर यांच्यासह उपशहर प्रमुख सौ.मनिषा प्रकाश वचकल, विभाग प्रमुख सौ.नंदा दिलीप जाधव या पदाधिकाऱ्यांनी पनवेल महानगरपालिकेचे वार्ड अधिकारी कवठे यांची भेट घेऊन त्यांच्यासमोर हि समस्या मांडली. सिडकोच्या गलथान कारभारामुळे ड्रेनेज लाइनच्या मेनरोडवरील ड्रेनेजची झाकणे खराब झाल्याने आतील सांडपाणी रस्त्यावर येत आहे. यामुळे परिसरात दुर्गंधी पसरली असून नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. यावर लवकरात लवकर उपाययोजना करावी अन्यथा मोर्चा काढण्यात येईल असा इशारा देण्यात आला.

## वाल्मिकी नगर येथील ड्रेनेज लाईन दुरुस्त करण्याची बाळासाहेबांच्या शिवसेनेतर्फे मागणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शहरातील वाल्मिकी नगर वसाहत येथील ड्रेनेज लाईनची अत्यंत दुरावस्था झाली असून हि ड्रेनेज लाईन तातडीने दुरुस्ती करावी अशी मागणी बाळासाहेबांची शिवसेनेचे पनवेल शहर प्रमुख प्रसाद सोनावणे यांनी पनवेल महानगरपालिकेकडे निवेदनाद्वारे केली आहे. या निवेदनात प्रसाद सोनावणे यांनी म्हटले आहे कि, पनवेल महानगरपालिका हद्दीतील वाल्मिकी नगर वसाहत येथील ड्रेनेज लाईनची अवस्था हि खूप गंभीर झालेली आहे. पंतप्रधान आवास योजने अंतर्गत वाल्मिकी नगर वसाहतीचे पुनर्वसन होणार आहे. परंतु असे असले तरीही सद्यस्थितीत वसाहतीतील सर्व नागरिकांना रोज दुर्गंधीचा सामना करावा लागतोय. याबाबत संबंधित अधिकाऱ्यांनी वसाहती मध्ये स्वच्छता करून दिली. परंतु हा विषय तात्पुरत्या साफसफाईने सुटणार नसून सदर ड्रेनेज लाईन दुरुस्त करण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे हि ड्रेनेज लाईन तातडीने दुरुस्ती द्यावी अशी मागणी प्रसाद सोनावणे यांनी केली आहे.


### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येत आहे की, मौजे : करवले बुद्रुक, ता.पनवेल, जि.रायगड येथील पनवेल महानगरपालिका हद्दीतील खालीलप्रमाणे वर्णन केलेली जमीन मिळकत आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : करवले बुद्रुक, ता.पनवेल, जि.रायगड**

| गट क्रमांक व उपविभाग | भूधारणा पद्धती | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| १९/१३/१ | भो वर्ग १ | ०-२८-००<br>पो.ख. ०-०५-००<br>एकूण ०-३३-०० | ०.७५ |
| पैकी अविभक्त क्षेत्र | | ०-१६-०० | ०.४३ |

वरील वर्णन केलेली मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापूर्वी विक्री, देणगी, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण कुळ इ. कोणत्याही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहीत खाली सही करणार यांच्याकडे त्यांच्या खाली दिलेल्या पत्यावर पोहोचवावी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क हितसंबंध नाही असे समजून सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

पनवेल
दि.०३/०१/२०२३

सही/-
**श्री.सिद्धेश अविनाश केणी**
**रा.पेठाली, पो.तळोजे,**
**ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०८**
**मो.नं.९९२०७६८३८२**



वकील : श्री.कालिदास पोटे

### जाहीर नोटीस

मा.दिवाणी न्यायाधिश, कनिष्ठ स्तर, पनवेल यांचे कोर्टात
चौ.अर्ज क्र.१८७३/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.०३/०२/२०२३

१) श्रीमती.शारदा प्रवीण मोरे
वय : ४७ वर्षे, धंदा : गृहिणी
२) कु.ऋषिकेश प्रवीण मोरे
वय : २५ वर्षे, धंदा : नोकरी
३) कु.ऋतुजा प्रवीण मोरे
वय : २२ वर्षे, धंदा : विद्यार्थी
सर्व रा.रुम नं.बी-३०३,
श्री गणेश को.ऑप.हौ.सो.,
प्लॉट नं.७५, सेक्टर १८,
कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड ... अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही ... सामनेवाला

वरील अर्जदार क्र.१ यांचे पती व अर्जदार क्र.२ व ३ यांचे वडील कै. प्रवीण रामचंद्र मोरे यांचे दि.२२/०५/२०२१ रोजी जनरल हॉस्पिटल, वाशी, नवी मुंबई येथे आजारपणामुळे निधन झाले. सदर मयताच्या नावे असलेली मिळकत खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**सदनिका नं.बी-३०३, तिसरा मजला, प्लॉट नं.७५,**
**सेक्टर-१८, कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड**
**एकूण क्षेत्रफळ ३५.२९ (चटई क्षेत्र)/**
**४२.४६८+६.५९ (बिल्टअप क्षेत्र) चौ.मी.**

वरील मिळकतीबाबत उक्त अर्जदारांनी वारस दाखला मिळण्याकरिता अर्ज दिला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार वारसदार नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल आणि वरील मिळकतीच्या वारस दाखल्याबद्दल कोणाचे हक्क, अधिकार अथवा हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास त्याने तशी लेखी हरकत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात हजर होवून दाखल करावी.

वरील मुदतीत कोणी योग्य त्या हरकती न दाखविल्यास सदरहू कोर्ट वरील अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबित दिसल्यास त्यांना सदरहू मिळकतीचे वारस म्हणून दाखला दिला जाईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.०३ माहे ०१/२०२३ रोजी माझ्या सहीने दिले.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.क.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.क.स्तर, पनवेल**


# मेंदडी येथून विवाहीत महीला बेपत्ता

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

म्हसळा तालुक्यातील मेंदडी येथील किशोरी रामा पाटील वय २० वर्ष हि विवाहीत महीला दिं२१-१२ -२०२२ पासून बेपत्ता आसल्याची खबर म्हसळा पोलीसांत महीलेचे वडील रामा रामचंद्र पाटील वय ५५ रा. मेंदडी यानी दिं २६-१२ -२०२२ रोजी दिल्याने म्हसळा पोलीसानी बेपत्ता मनुष्य राजि ४/२०२२ ने नोंद करून शोध सुरु केला आहे.

महीला शौचालयाला जाते म्हणून सांगून गेली ती अद्यापही परत आली नसल्याचे वडीलानी आपल्या तक्रारीत सांगितले. बेपत्ता महीलेचे वर्णन उंची ५ फूट , शरीर बांधा मध्यम,चेहरा उभट, डोळे- केस काळे , पेहराव जांभळ्या रंगाचा पंजाबी ड्रेस आसल्याचे तपासी अंमलदार के.अे.नलावडे यानी सांगितले.


### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत आमचे अशिलांने प्रस्ताविक जमीन मालक सुर्याजी तानाजी भोईर या जमीन मालकाकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. तरी सदर जमीन मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरिता प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत. सदर बिनशेती मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**बिनशेती मिळकतीचे वर्णन**
**मौजे : रिस, तालुका : खालापूर, जिल्हा : रायगड**

| गावाचे नाव | भूमापन नं./उपविभाग | क्षेत्र आर.चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| रिस | २२/१/अ | २१-००-८० | २१०.०० |

प्राप्त परिस्थितीत वरील परिशिष्टामध्ये नमूद केलेल्या बिनशेती जमीन मिळकतीमध्ये वा कोणत्याही भागावर कोणाही व्यक्तीचे कसल्याही प्रकारचे करार-मदार, गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु. वा तत्सम कोणतेही दावे, मालकी व अन्य हक्क हितसंबंध असल्यास त्या व्यक्तींनी वा संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी कळवावे अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे पक्षकार सदर मिळकतीचे हस्तांतरणाचे व्यवहाराचे काम पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या तक्रारी, दावे, हरकती या रद्दबातल आहेत व त्या जाणीवपूर्वक सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दि.०३/०१/२०२३

सही/-
**ॲड.श्री.दिपक आर. शेळके**
**डी-३/१, किनारा हौ.सो.बावन बंगलो,**
**ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६**
**मो.नं.९८२०७९५६०५**



### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे : खारघर, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालील व्यक्तीचे मालकीचा व ताबेकब्जातील खालील वर्णनाची जमीन आमचे राजा बाळाराव रुस्तमराव सेवा फाऊंडेशन तर्फे श्री.बलजिंदर सिंग संधू अशिल पत्ता : सदनिका नं.१३०३, भूखंड क्रं.५, साई स्प्रिंग, सेक्टर-३५/जी, खारघर, नवी मुंबई यांनी खाली वर्णन केलेल्या मिळकतीचा व्यवहार करण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : खारघर, ता.पनवेल, जि.रायगड**

| भूखंड क्र. | सेक्टर | नोड | क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|---|
| ४५ | १८ | खारघर | ४० |
| ४७ | १८ | खारघर | ४० |
| ४८ | १८ | खारघर | ४० |

सबब वर नमूद जमिनीवर कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळवहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण दान, बोजा, बक्षिस चार्ज लाज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत हक्क हितसंबंध स्वरुप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांच्या पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात अगर समक्ष येवून भेटावे.

वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा वगैरे न आल्यास सदर जमीन निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणताही प्रकारची हरकत, तक्रार दावा, हितसंबंध नाही असे समजून आमचे सदर वर नमूद मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारचा हरकती, तक्रारी दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची तमाम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दि.०३/०१/२०२३

सही/-
**ॲड.राहुल ब. लोंढे**
**१०१, खोडाल धाम, भूखंड क्रं.५३,**
**सेक्टर-१९, कामोठे, नवी मुंबई-४१०२०६**



### ग्रामपंचायत कोळखे

ता.पनवेल, जि.रायगड

### जाहीर निविदा

दि. ०३/०१/२०२३

प्रति,
अधिकृत / अनुभवी ठेकेदार,

यांस कळविण्यात येते की, ग्रामपंचायत कोळखे हद्दीतील खालील विकासकामे करावयाची आहेत. त्याकरिता ग्रामपंचायत हद्दीतील अधिकृत/अनुभवी ठेकेदारांकडून सिलबंद निविदा मागविण्यात येत आहे. सदर कामांच्या कोऱ्या निविदा मिळण्याकरिता अर्जाची तारीख दि. ०४/०१/२०२३ ते ०९/०१/२०२३ पर्यंत या दिवशी कार्यालयीन वेळेत ग्रामपंचायत कार्यालयात मिळतील.

सदर निविदा दि. १०/०१/२०२३ रोजी दुपारी २ वाजेपर्यंत स्वीकारल्या जातील. सदर निविदा त्याच दिवशी कार्यालयीन वेळेत ३ वाजेपर्यंत उघडण्यात येतील. कामांकरिता लागणारी इसारा रक्कम ग्रामपंचायत कोळखे यांच्या नावाने डिमांड ड्राफ्टच्या द्वारे / रोखीने स्वीकारण्यात येतील. कोणतीही एक निविदा मंजूर करणे अगर नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे. इसारा रक्कम अंतिम देयकातून कापून घेतली जाईल.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रक रक्कम | इसारा रक्कम १% | कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | कोळखे येथील राजिप शाळा कोळखे ते नंदकुमार जाधव घरापर्यंत दिड इंच व्यासाची यु : पि.यु.सी. पाईप लाईन टाकणे | २८९४७२/- | २८९४/- | १ महिने |
| २ | कोळखे पेठ करिता नवीन विसर्जन घाट बांधणे | ४९७७०८/- | ४९७७/- | १ महिने |

**अटी व शर्ती :-**

१) सर्वांत कमी दराचे अथवा कोणतेही टेंडर मंजूर अगर नामंजूर करण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे त्याची कारणे दिली जाणार नाहीत.

२) सदर काम पंचायत समितीकडील बांधकाम विभाग तांत्रिक अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली करणेचे आहे त्याचे मूल्यांकनाप्रमाणे बील अदा करण्यात येईल.

३) काम ज्यांच्या नावे मंजूर होईल त्यांनी नियमा प्रमाणे रूपये १०० स्टॅम्प पेपरवर बॉण्ड करून देणे.

४) कामाचे एस्टीमेंट ऑफिस वेळेत पहावयास मिळेल.

५) दिलेल्या मुदतीत काम पूर्ण न झाल्यास बिल अदा करणे अगर न करणे याचा अधिकार ग्रामपंचायतीस राहील.

**सही/-**
**ग्रामसेवक**
**ग्रामपंचायत कोळखे**

**सही/-**
**सरपंच**
**ग्रामपंचायत कोळखे**


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

## संक्षिप्त...

### जिल्ह्यात दि.११ फेब्रुवारी रोजी राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण उच्च न्यायालय मुंबई यांच्या आदेशावरून संपूर्ण रायगड जिल्ह्यामध्ये दि.११ फेब्रुवारी २०२३ रोजी राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे, असे दिवाणी न्यायाधीश तथा सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, रायगड-अलिबाग श्री.अमोल अ.शिंदे यांनी कळविले आहे.

या राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये न्यायालयात प्रलंबित असलेली भूसंपादन प्रकरण, मोटार आपघात प्रकरणे, १३८ एन.आय क्ट खालील प्रकरणे, दिवाणी अपिले, तडजोडपात्र पालिका व ग्रामपंचायत यांच्या घरपट्टी बिलाच्या देयकाबाबतची वादपूर्व प्रकरणे, भारत दूर संचार निगम लिमिटेड, वीज वितरण, राष्ट्रीयकृत बँका आणि पतसंस्था यांच्याकडील थकबाकीबाबतची वादपूर्व प्रकरणे तडजोडीसाठी ठेवण्यात येणार आहेत.

राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये प्रकरणे तडजोडीने निकाली केल्यास लोकांचा पैसा आणि वेळ यांचा अपव्यव होत नाही, पक्षकारांना तात्काळ न्याय मिळतो. त्यामुळे दि.११ फेब्रुवारी २०२३ रोजी होणाऱ्या राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये मोठया संख्येने प्रकरणे तडजोडीने निकाली काढण्यासाठी सहकार्य करावे आणि या लोकअदालतीचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण श्रीमती एस.एस.सावंत यांनी केले आहे.

# जेएनपीए बंदराची 2022 मध्ये विक्रमी कामगिरी

## वर्ष 2022 मध्ये केली आजवरची सर्वाधिक माल हाताळणी

**दै.रायगड नगरी । उरण**

जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण अर्थात जेएनपीए हे भारतातील सर्वोत्कृष्ट कामगिरी करणारे बंदर असून जेएनपीए ने वर्ष २०२२ मध्ये विक्रमी माल हाताळणी केली आहे. जेएनपीए मध्ये वर्ष २०२२ मध्ये एकूण ५,९५९,११२ टीईयू कंटेनरची वाहतूक करण्यात आली आहे जी वर्ष २०२१ च्या ५,६३१,९४९ टीईयू च्या तुलनेत ५.८१% अधिक आहे. त्याचबरोबर जेएनपीए ने २०२२ मध्ये एकूण ८१.१ दशलक्ष मेट्रिक टन वाहतूक केली आहे जी २०२१ च्या ७६.१ दशलक्ष मेट्रिक टनाच्या तुलनेत ६.५५% अधिक आहे. जेएनपीए बंदरात वर्ष २०२२ मध्ये झालेली एकूण ८१.१ दशलक्ष मेट्रिक टन वाहतूक व ५,९५९,११२ टीईयूची कंटेनर वाहतूक ही बंदराच्या स्थापनेपासून आजवर एका वर्षात हाताळलेली सर्वाधिक वाहतूक आहे.

जेएनपीएच्या या विक्रमी कामगिरीसाठी बंदरातील कर्मचारी आणि भागधारकांचे त्यांच्या समर्पित परिश्रमाबद्दल कौतुक करताना जेएनप-ीएचे अध्यक्ष श्री संजय सेठी, भा.प्र.से. म्हणाले, २०२२ हे वर्ष जेएनपीए साठी अभूतपूर्व ठरले कारण आम्ही या वर्षात विक्रमी माल हाताळणी करून बंदरातील आजवरची सर्वाधिक वाह-तूक करण्याचा कीर्तिमान स्थापन केला आहे. बंदरातील सर्व टर्मिनल ऑपरेटर्सची कामगिरी विशेष कौतुकास्पद झाली आहे. याशिवाय, २०२२ मध्ये, आम्ही भारतातील सर्वोत्तम कामगिरी करणारे बंदर असा बहुमान प्राप्त केला आहे. यासोबतच जेएनपीए हे भारतातील पहिले १००% लैंडलॉर्ड मेजर पोर्ट बनले असून उत्कृष्ट कामगिरीसाठी जेएनपीएला विविध प्रतिष्ठित पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे. याप्रसंगी मी आमचे कामगार व भागधारक यांचे विशेष आभार मानू इच्छितो कारण बंदराच्या कामगिरी मध्ये निरंतर वाढ करण्यामध्ये आणि जेएनपीएच्या यशोगाथेमध्ये त्यांचे महत्वपूर्ण योगदान आहे. बंदराच्या उत्कृष्ट कामगिरीची व प्रयत्नांची दखल घेत जेएनपीएला सागरी आणि लॉजिस्टिक पुरस्कार २०२२ मध्ये कंटेनर बंदरांच्या श्रेणीतील २०२२ चा 'वर्षातील सर्वोत्कृष्ट मेजर पोर्ट'चा पुरस्कार आणि इकॉनॉमिक टाइम्स इन्फ्रा फोकस अवॉर्ड्स २०२२' चा मोस्ट ॲडमायर्ड सेंट्रल एंटिटी प्रमोटिंग पीपीपी (पोर्ट्स) पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले आहे.



# रोजी अश्विनी कुमार सोनी यांना सर्वश्रेष्ठ फोटोजेनिक पुरस्कार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

मिसेज इंडिया द गॉड एसेज़ प्रेजंट्स मधु कमल मोशन पिक्चर्स आयोजित लक्मे अकादमी आणी गृहशोभा द्वारा प्रायोजित सौंदर्य स्पर्धेत सौ.रोजी अश्विनी कुमार सोनी यांना सर्वश्रेष्ठ फोटोजेनिक पुरस्कार मिळाला.

उदयपुर येथील रमाडा स्पा एंड रिसॉर्ट्समध्ये सदर राष्ट्रीय स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये नवी मुंबईच्या विधीज्ञ् सौ.रोजी अश्विनी कुमार सोनी मिसेज इंडिया, द गॉडेस प्रेजेंट स्पर्धेत फाइनलिस्ट होत्या. देशभरातील असंख्य स्पर्धक सदर स्पर्धेत सहभागी झाले होते. त्यांना सर्व फाइनलिस्ट मधून सर्वश्रेष्ठ फोटोजेनिक पुरस्कारासाठी निवडून सम्मानित करण्यात आले. नवी मुंबई पनवेल मधून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



सौ.रोजी अश्विनी कुमार सोनी यांचा सगळा जीवन प्रवास खुपच विलक्षणीय आहे. त्यांना विद्यमान २० आणी १८ वर्षाच्या दोन मुलं आहेत. लग्न लवकर झाल्याने त्यांनी लग्नाच्या चौदा वर्षानंतर स्वतःचे एल एल बी शिक्षण पुर्ण केले. सध्या निष्णात वकील म्हणून त्यांची ख्याती आहे. त्या पुढील एलएलएम कोर्स करण्याची तयारी करत आहेत.

हरियाणा राज्यातील एका छोटेखानी शहरात त्यांचा जन्म झाला आहे. मुंबई आल्यानंतर त्यांनी आपल्या शिक्षणावर लक्ष केंद्रित केले आणी वयाच्या ३६ व्या वर्षी आजचा बहुमान संपादित केला आहे. त्यामुळे त्यांच्या यशाचे सर्वांनाच मोठे अप्रूप वाटत आहे. घरसंसार मध्ये लक्ष देऊन स्वतःचे शिक्षण व करिअर करण्यासाठी इच्छुक महिलांना सौ.रोजी अश्विनी कुमार सोनी यांचे यश प्रेरणादायी आहे. लग्न मुलबाळ असतांना देखील त्यांनी जीवनात बाळगलेलं ध्येय साधणे सुरु ठेवले आहे. महिला आणी बालकांचे अधिकार याबाबतीत त्या विशेष दक्ष असतात. प्रशासकीय सेवेत जाण्याचे त्यांचे भविष्यात ध्येय आहे.

# मजगांव रस्त्यावर गतीरोधक बसवावेत : नागरिकांची मागणी



**दै.रायगड नगरी । राजीव नेवासेकर**

**कोर्लई ।** मुरुड-जंजिरा पर्यटनात साळाव ते मुरुड दरम्यान वाहनांची वाढती वर्दळ असून मजगांव स्थानकावर अपघाताची शक्यता लक्षात घेऊन झेब्रा पट्टे मारावेत किंवा गतीरोधक बसवावेत. अशी मागणी नागरिकांतून करण्यात येत आहे. सरत्या वर्षाला निरोप देण्यासाठी नववर्षाच्या स्वागतासाठी मुरुड-जंजिरा, कुडालेणी आदी. पर्यटन स्थळे, समुद्र सफरीचा मनमुराद आनंद लुटण्यासाठी थर्टी फस्ट, शनिवार, रविवारी या रस्त्यावर वाहनांच्या रांगा लागल्या होत्या तसेच या ठिकाणी सुटीच्या दिवशी पर्यटक मोठ्या प्रमाणावर येत आहेत.या रस्त्यावर साततत्याने वाढती वर्दळ असते.मजगांव स्थानक दरम्यान अतिवेगाने येणाऱ्या वाहनांमुळे अनेक वेळा छोटेमोठे अपघात झाले आहेत. याठिकाणी वेळप्रसंगी अपघाताची शक्यता लक्षात घेऊन शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाने या रस्त्यावर झेब्रा पट्टे किंवा गतीरोधक बसविण्यात यावेत. अशी मागणी नागरिक व प्रवासी वर्गातून होत आहे.

# बोर्लीपंचतन रुग्णालयात औषधांचा तुटवडा

## सामान्य रुग्णांना बसते आर्थिक झळ

**दै.रायगड नगरी । गणेश प्रभाळे**

**दिघी ।** श्रीवर्धन तालुक्यातील बोर्लीपंचतन परिसरातील जन-तेला प्रथम उपचारासाठी बोर्ली शहराच्या प्राथमिक रुग्णालयात धाव घ्यावी लागत आहे. मात्र, छोट्या - मोठ्या अपघातात आणि आजारात लागणाऱ्या औषधांचा साठा संपल्याने रुग्णांची मोठी गैरसोय होत आहे.

बोर्लीपंचतन गावातील प्राथमिक आरोग्य केंद्र हे ग्रामीण रुग्णालय व्हावे यासाठी कित्येक वर्ष ग्रामस्थांकडून मागणी करण्यात येत आहे. कारण महिन्याभरात १४०० पेक्षा अधिक रुग्णांनी येथे उपचार केल्याचे ओपीडी च्या नोंदनी संख्येमुळे कळते, मात्र, या प्राथमिक आरोग्य केंद्रात आवश्यक असणारा उपचार, तो हि मिळत नसल्याची ओरड आहे. रुग्णालयात महिनाभरापासून औषधांचा साठा संपला आहे. येथील रुग्णालयाची भव्य इमारत उभी आहे. मात्र, नागरिकांना पुरवण्यात येणाऱ्या प्राथमिक सुविधांकडे सरकार आणि लोकप्रतिनिधींकडून दुर्लक्ष होत असून यात नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे.

बदलत्या वातावरणामुळे ग्रामीण भागातील रुग्णांची संख्या वाढली आहे. त्यामुळे या आजारातील रुग्ण तसेच दैनंदिन कामात अचानक होणाऱ्या दुखापतीमुळे उपचार घेण्यासाठी रुग्णालयात गर्दी असते. मात्र, रुग्णांच्या जखमेवर ड्रेसिंग करण्यापूरतेच उपचार होत असून, आवश्यक असणाऱ्या टी टी. तसेच डाईक्लो अशा औषधांचा तुटवडा असल्याने बाहेरून औषधांची खरेदी करावी लागत असल्यामुळे रुग्ण व त्यांच्या नातेवाइकांचे सध्या हाल सुरू आहेत.



---

मा.गोडसे सो

प्रो.जमा.५०/- ॲड.समाधान काशिद, कामोठे अर्जदारतर्फे वकील

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.१९४२/२०२२

नि.नं.७/ड

ने.ता.१३/०२/२०२३

राजेंद्र रामच्रंद सावंत — अर्जदार

विरुद्ध

श्री.रवींद्र रामचंद्र सावंत — सामनेवाले

ज्याअर्थी कै.राजेश्री रामचंद्र सावंत या दि.०२/०२/२००९ रोजी सिव्हील हॉस्पिट, ठाणे येथे मृत्यू पावले असून त्यांचे नावे खालील वर्णनाची मिळकती आहे.

**मिळकतीचे वर्णन :- सदनिका क्रं.३०१, तिसरा मजला, ए विंग, बालाजी पुजा को.ऑ.सोसा., प्लॉट नं.१९, सेक्टर नं.०९, कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड. त्याचे क्षेत्रफळ २६.०२ चौ.मी.बिल्टअप**

कै.राजेश्री रामचंद्र सावंत यांस अर्जदार हे कायदेशीर वारसदार आहेत. सबब अर्जदार सदरचा अर्ज करीत आहेत. सदर वारसांव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब सदरचा वारस दाखला अर्जदार यांस देण्यासंबंधी कोणाही इसमाच्या कोणत्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाहीत असे समजून अर्जदार यांस वारस दाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

दि.०२/०१/२०२३ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** (कोर्टाचा शिक्का) **सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

### जाहीर नोटीस

प्रस्तुतच्या जाहीर नोटीसीने सर्वांना कळविण्यात येते की, पनवेल महानगरपालिका हद्दीतील हरिओम आर्केड को.ऑप.हौसिंग सोसायटी लि., (नोंदणी क्रमांक : आर.जी.डी./पी.डब्ल्यू.एल./ एच.एस.जी. (टि.सी.) १२९०/२००२-२००३/सन २००३, दि.४/०३/२००३), या नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या अविभक्त हिश्श्याच्या व सामाईक मालकीच्या अंतिम भूखंड क्रमांक ५१ (पैकी) व ५१ अ (पैकी) उपभूखंड क्र.भाग-१, काळण समाज हॉल समोर, जुना ठाणा नाका, मौजे : पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६ या दोन्ही रहिवासी भूखंडाचे व त्यावरील बांधलेल्या इमारत मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे :-

| अनु क्र. | अंतिम भूखंड क्रं. | उपभूखंड क्रं. | पैकी क्षेत्र (चौ.मी.) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|---|
| १ | ५१ (पैकी) | - | १४७६.९५ चौ.मी. | - |
| २ | ५१ अ (पैकी) | भाग-१ | १४७.५० चौ.मी. | - |
| एकूण | दोन | | १६२४.४५ चौ.मी. | |

सदर दोन्ही भूखंड मिळकती व त्यावरील बांधलेली इमारत या बाबतीत कोणाचाही कोणत्याही प्रकारचा बोजा, हक्क, हितसंबंध, दान, गहाण, तारण, बक्षिसपत्र, साठेकरार, खरेदी विक्री-व्यवहार, अन्न, वस्त्र, पोटगी, कुळ, वहिवाट, विश्वस्त, दिवाबत्ती, जामिन, मुखत्यार, लिव्ह ॲण्ड लायसन्स, भाडेपट्टा, मृत्यूपत्र, इजमेंट, वारसाहक्क, कर्ज, बयाणा, तबदील या अथवा अन्य हस्तांतरण वा इतर कोणत्याही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास प्रस्तुतची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांत खाली सही करणार यांचेकडे योग्य त्या सर्व मुळ कागदपत्रे व पुराव्यांसह लेखी हरकती दाखल कराव्यात. सदर नोटीस ही उपरोक्त दोन्ही भूखंड व त्यावरील इमारत मिळकतीचे टायटल हे निर्वेध व निर्जोखमी असल्याबाबत खात्री करणेकरिता हरकती मागविण्यात येत आहेत. त्याप्रमाणे मुदतीत प्रत्यक्ष लेखी (Hard copy format) हरकती व पुरावे न आल्यास व सदर नोटीसीच्या मुदतीनंतर येणाऱ्या व या जाहिरातीच्या विरुद्ध वर्तमानपत्रात जाहीर केलेल्या सुचना, पुरावे व हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची नोंद घेण्यात यावी व सदर दोन्ही भूखंड व इमारत मिळकतींचे टायटल हे निर्वेध व निर्जोखमी आहे, असे समजून यापुढील इमारत पुनर्विकसनाची कार्यवाही करण्यात येईल.

ठिकाण : पनवेल

दि.०३/०१/२०२३

**सही/-**

**ॲड.निलीमा नि. नात्ती**

**प्लॉट क्र.१४२/अे, पहिला मजला, मिडलक्लास हौ.सो.लि., युनियन बँकेच्यावर, गांधी हॉस्पिटलच्या बाजूला, सुरूची हॉटेल समोर, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६ मो.नं.९१-८६९२९३१२२२**

---

मे.सोनावणे सो

प्रो.जमा.६-२५ अर्जदाराचे वकील ॲड.निकिता बी. जाधव

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१९०३/२०२२

नि.नं.८

ने.ता.०८/०२/२०२३

१) श्रीमती.निर्मला अरविंद खरे
वय : ८० वर्षे, धंदा : गृहस्थि
रा.रुम नं.३५/ए, सत्यधाम,
सायन हौ.सोसायटी स्किम ६, रोड नं.२,
सायन ईस्ट, मुंबई ४०००२२
२) श्रीमती.मनिषा अविनाश खरे
वय : ५० वर्षे, धंदा : नोकरी
रा.रुम नं.३५/ए, सत्यधाम,
सायन हौ.सोसायटी स्किम ६, रोड नं.२,
सायन ईस्ट, मुंबई ४०००२२
३) कु.प्राजक्ता अविनाश खरे
वय : २६ वर्षे, धंदा : नोकरी
रा.रुम नं.३५/ए, सत्यधाम,
सायन हौ.सोसायटी स्किम ६, रोड नं.२,
सायन ईस्ट, मुंबई ४०००२२ — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

ज्यापेक्षा कै.अविनाश अरविंद खरे हे दि.२७/०६/२०२२ रोजी रा.रुम नं.३५/ए, सत्यधाम, सायन हौ.सोसायटी सी.एच.एस.६, सायन ईस्ट, मुंबई ४०००२२ येथे मृत्यू पावले आहेत.

**मिळकतींचे वर्णन**

**१) सदनिका नं.१९०५, एकोणिसावा मजला, इंडिया बुल्स ग्रीन्स, सेक्टर क्र.४, बिल्डींग नं.१० जी १, कोन, ता.पनवेल, जि.रायगड. क्षेत्रफळ ६९.१३ चौरस मीटर कारपेट एरिया.**

कै.अविनाश अरविंद खरे यांचे मृत्युपश्चात त्यांस अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. सदर वारसांव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब, अर्जदार यांनी सदरचा वारस दाखला मिळण्यासाठी अर्ज करीत आहे. सदर वारसांव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब, सदरचा वारस दाखला अर्जदार यांस देण्यासंबंधी कोणाही इसमाच्या कोणत्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाहीत असे समजून अर्जदार यांस वारस दाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.०३/०१/२०२३ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** (कोर्टाचा शिक्का) **सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

गुन्नाल सो.

ॲड.प्रिया मोरे

### जाहीर नोटीस

मे.पनवेल येथील दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.१९०८/२०२२

नि.नं.७/ड

ने.ता.२१/०२/२०२३

१) श्रीमती.आनंदीबाई सखाराम कवर
वय : ६४ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.पिंपळगाव, कवरवाडी, ता.पाटण, सातारा ४१५२०६
२) श्रीमती.कमल सुनील कवर
वय : ३८ वर्षे, धंदा : गृहिणी
३) कु.साहिल सुनील कवर
अज्ञान तर्फे पालनकर्ती आई अर्जदार नं.२
वय : १६ वर्षे, धंदा : शिक्षण
४) कु.सर्वेश सुनील कवर
अज्ञान तर्फे पालनकर्ती आई अर्जदार नं.२
वय : १३ वर्षे, धंदा : शिक्षण
अर्जदार नं.२ ते ४
सर्व रा.फ्लॅट नं.३०५, ३ रा मजला,
पार्थ अव्हेन्यु सी.एच.एस.लि., प्लॉट नं.७०,
सेक्टर २०, कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

वरील अर्जदार नं.१ यांचा मुलगा, अर्जदार नं.२ यांचे पती, अर्जदार नं.३ व ४ यांचे वडील कै.सुनील सखाराम कवर यांचे दि.०६/०९/२०१९ रोजी न्यू पल्स हॉस्पिटल, कामोठे येथे आजाराने निधन झाले. मयत कै.सुनील सखाराम कवर यांचे नांवे असलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मालमत्तेचे वर्णन**

**अ) फ्लॅट नं.३०५, ३ रा मजला, पार्थ अव्हेन्यु सी.एच.एस.लि., प्लॉट नं.७०, सेक्टर २०, कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड (१००% मालक)**

**ब) शॉप नं.१३, तळमजला, साई प्रसाद एन्कलेव्ह, प्लॉट नं.२७, सेक्टर ७, कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड**

**वर नमूद केलेल्या मालमत्तेचे कै.सुनील सखाराम कवर (१/५ शेअर) चे मालक आहेत.**

**मुल्यांकन : रु.२४,५०,०००/- (रु.चोवीस लाख पन्नास हजार मात्र)**

वरील मिळकतीबाबत अर्जदाराने वारसांचा दाखला मिळणेबाबत अर्ज दिलेला आहे. तरी वरील वारसांचे दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क अधिकार अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत योग्य कागदपत्रासहीत या न्यायालयात दाखल करावी. वरील पद्धतीने कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदाराच्या विनंतीप्रमाणे वारसांचा दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.०३/०१/२०२३ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** (कोर्टाचा शिक्का) **सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

मे.गोडसे सो.यांचे न्यायालयात

अर्जदारांतर्फे वकील : ॲड.उमेश व. चांदोरकर

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.१९३४/२०२२

नि.नं.७/ड

ने.ता.२७/०२/२०२३

१) श्री.सुबोध प्रभाकर पाटील
वय : ५० वर्षे, धंदा : नोकरी
रा.बी-१०३, कनक सरोवर को.ऑ.हौ.सो.,
जुना ठाणा नाका रोड, पनवेल-४१०२०६, रायगड
२) श्री.सुहास प्रभाकर पाटील
वय : ५३ वर्षे, धंदा : व्यवसाय
रा.बी-१०८, मुणोत रेसिडेन्सी, ठाणा नाका,
एच.ओ.सी. कॉलनीसमोर, पनवेल-४१०२०६, रायगड
३) सौ.सुविद्या राजेंद्र वावेकर
वय : ५५ वर्षे, धंदा : नोकरी
रा.१०१, पहिला मजला, कनक इंदिरा लाईन आळी,
व्हि.के.हायस्कूल जवळ, पनवेल-४१०२०६, रायगड
४) श्री.प्रभाकर बाळकृष्ण पाटील
वय : ८४ वर्षे, धंदा : निवृत्त
रा.बी-१०३, कनक सरोवर को.ऑ.हौ.सो.,
जुना ठाणा नाका रोड, पनवेल-४१०२०६, रायगड — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

सर्व लोकांना या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येत आहे की, ज्याअर्थी मयत कै.प्रमोदिनी प्रभाकर पाटील यांचा मृत्यू दि.११/१२/२०२० रोजी अपोलो हॉस्पिटल, सि.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई येथे झाला असून त्यांच्या मृत्यूपश्चात त्यांचे कायदेशीर वारस १) श्री.सुबोध प्रभाकर पाटील-मुलगा, २) श्री.सुहास प्रभाकर पाटील-मुलगा, ३) सौ.सुविद्या राजेंद्र वावेकर-मुलगी, ४) श्री.प्रभाकर बाळकृष्ण पाटील-पती हे आहेत. मृत्यूसमयी मयत कै.प्रमोदिनी प्रभाकर पाटील यांचे नावे व मालकी कब्जात खालील वर्णनाच्या मिळकती होत्या.

मिळकतींचे वर्णन

१) पनवेल येथील शॉप / गाळा नं.९, कनक सरोवर, इ-विंग, फा. प्लॉट नं.१७, सब प्लॉट-४ व ५, ठाणा नाका रोड, पनवेल-४१०२०६, जि.रायगड (कार्पेट एरिया २७६ चौ.फूट)

२) पनवेल येथील कव्हर्ड कार पार्कींगसह फ्लॅट नं.१०३, पहिला मजला, कनक सरोवर, बि-विंग, फा.प्लॉट नं.१७, सब प्लॉट १, २, ३ व ६, ठाणा नाका रोड, पनवेल-४१०२०६, जि.रायगड

(कार्पेट एरिया-६२८ चौ.फुट + टेरेस एरिया २४३ चौ.फुट + पार्कींग एरिया १२० चौ.फूट)

आणि

३) मौजे : नेरे, ता.पनवेल, जि.रायगड येथील पुढील वर्णनाची जमीन मिळकत व त्यावरील घर नं.८४६ या जुन्या घरासह या सर्व मिळकतीमधील ५०% अविभाजीत हिस्सा

| सर्व्हे / गट नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| १६९ | २ | ०-०५-१<br>पो.ख. ०-०१-३<br>एकूण ०-०६-४<br>त्यावरील घर नं.८४६ या जुन्या घरासह या सर्व मिळकतीमधील ५०% अविभाज्य हिस्सा | ००.८४ |

वर वर्णन केलेल्या मिळकतींच्या अनुषंगाने वारस दाखला मिळणेकामी अर्जदार यांनी मे.न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

सबब, सदरच्या वारसदाखला मिळावा म्हणून केलेल्या अर्जाचे कामी कोणाच्याही कसल्याही हरकती असल्यास सदरच्या हरकती ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत लेखी हरकत स्वतः अथवा वकीलांमार्फत मे.न्यायालयात सादर कराव्यात. सदर नोटीसीच्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास व अर्जदार यांनी दिलेला पुरावा सिद्ध झाल्यास ह्या अर्जदारांचे लाभांत वारस दाखला दिला जाईल याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी आज रोजी दि.०३/०१/२०२३ रोजी दिली.

**सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** (कोर्टाचा शिक्का) **सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

